## आदेश निशाणी क्र.२६ वर

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार यांनी दिला असून त्याव्दारे त्यांनी त्यांच्या विरुध्द झालेला प्रकरण विनाजबाब चालण्याचा आदेश रद्द होवून लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

०२. गैरअर्जदार सांगतात, सदर केस मध्ये गैरअर्जदार हे मागील तारखेच्या दिवशी मजुरी कामासाठी पुणे येथे राहत असल्यामुळे विदयामान न्यायालयात तारखेवर हजर राहू शकले नाही. त्यामुळे विदयामान न्यायालयाने मागील तारखेच्या दिवशी विना लेखी जबाबाचा आदेश केलेला आहे. तरी विनालेखी जबाबाचा आदेश रद्द होवून लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. दि.२६.११.२०२४ रोजी गैरअर्जदाराने प्रकणात लेखी जबाब दाखल केलेला नसल्यामुळे नि.क.०१ प्रकरण गैरअर्जदाराचा विना जबाबाचे चालविण्या बाबत आदेश पारीत करण्यात आला आहे. परंतु गैरअर्जदार आजरोजी लेखी जबाब दाखल करण्यास तयार असल्याने वर नमुद कारणास्तव प्रकरणात झालेला विनाजबाब आदेश रद्द करुन गैरअर्जदार यांना लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणे गरजेचे आहे म्हणुन हा अर्ज.

०४. अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे देवून या अर्जास हरकत दर्शविली. ते सांगतात, गैरअर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा मुदतीत नाही. अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजूर झाल्यास अर्जदारास उशीराने न्याय मिळेल त्यामुळे सदरचा अर्ज खारीज व्हावा अशी विनंती केली आहे.

०५. अर्जदार तसेच गैरअर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुतचे प्रकरण हे, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे

खावटी मिळणे बाबत आहे. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये या गैरअर्जदार हे पुणे येथे मजुरी कामासाठी गेले असल्यामुळे न्यायालयात हजर राहू शकले नाही व न्यायालयात येवून लेखी जबाब दाखल करु शकला नाही व वकीलांना माहीती देवू शकले नाही अशी कारणे नमुद केली आहेत. गैरअर्जदाराने त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञालेख दाखल केला आहे.

०७. प्रस्तुत अर्जाचे तसेच मुळ प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता व नैसर्गिक न्यायतत्वांचा व अर्जातील नमुद कारणांचा विचार करता गैरअर्जदार यांना संधी देणे उचित वाटते. तशी संधी देण्याने गैरअर्जदार यांचा लेखी जबाब अभिलेखावर येईल तसेच प्रकरण हे गुणवत्तेवर निर्णय देणे कामी मदतच होईल.

०८. सबब, वरील चर्चेचा व अर्जाचे स्वरुपाचा विचार करता अंतिम न्यायाच्या दृष्टीने दिनांक २६.११.२०२४ रोजीचा विनाजबाब आदेश रद्द करुन प्रतिवादी हजर झाल्यापासून लेखी जबाब दाखल करण्याच्या दरम्यानच्या कालावधीचा विचार करता गैरअर्जदार यांनी रु.५०० (रुपये पाचशे) इतक्या खर्चासह गैरअर्जदार यांचा नि.क्र.२६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.11.17 15:00:25 +0530

(श्रीमती एस. एच. उके)

दिनांक : १५.११.२०२५

न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. २ रे
चिखली

**<u>C E R T I F I C A T E</u>**

| | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original order. | | |
| Name of the Stenographer | : | S.B. Deshpande |
| Name of the Court | : | Jt C.J.J.D. Chikhali. |